Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850

Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 8 | Sept - 2015

वाशिम जिल्हयातील कृषी व्यवस्थापन -एक अध्ययन

प्रा. वसंत व्हि. आरू
सहा. प्राध्यापक , वाणिज्य विभाग , श्री रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव ता.मालेगांव जि. वाशिम .

प्रस्तावना :-

वाशिम जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या मध्ये पुर्वेकडे बसलेला जिल्हा असून उत्तर अक्षांस १९.६१ ते २१.१६ आणि रेखांश ७६.७ ते ७७.१४ अंशाचे दरम्यान पसरलेला आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ५१९६ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या १.६५ टक्के आहे. १ जुलै १९९८ रोजी जिल्हयाची निर्मीती झाली असून जिल्हयात एकूण वाशिम , मालेगांव, रिसोड, मंगरूळपीर , कारंजा व मानोरा असे सहा तालुके आहेत. जिल्हयाचा मयध्भाग हा सपाट असून अजिंठा पर्वताचा काही भाग मालेगांव तालुक्यात आहे. तसेच दक्षणेला पैनगंगा नदी असून ती रिसोड तालुक्यातन वाहत जाऊन पुढे गोदावरील नदीला मिळते. वाशिम जिल्हयाची समुद्र सपाटीपासून उंची ३३५ ते ५६७ मिटर दरम्यान आहे. जिल्हयातील सरासरी पर्जन्य ७९८.७० असून २०१२-१३ मध्ये ७.२१.९७ पर्जन्याची नोंद झाली आहे. एकूण लोकसंख्या ११९६७१४ इतकी असून ९८५०५८ ग्रामीन भागात वास्तव्य करते. त्यामुळे वाशिम जिल्हा हा ग्रामीन जिल्हा ठरतो.

वाशिम जिल्यातील शेती :-

वाशिम जिल्हया मुख्यत: जमीनीच्या ३ प्रकारात मोडतो १) मध्यम काळी जमीन २) काळी कसदार जमीन ३) हलकी व खडकाची जमीन आहे. जिल्हयाच्या आजुबाजूला मध्यम स्वरूपाची व हलक्या प्रतीची जमीन आहे. १ ते२ हेक्टर असणारे शेतकरी हे ५८१४० आहेत. तर २ ते ५ हेक्टरी जमीन धारण करणारे ४८२६४ शेतकरी आहेत. ५ ते १० हेक्टर क्षेत्र असणारे शेतकरी हे फक्त ८.७१ % आहेत. १० हेक्टरच्या वर जमीन धारण करणारे शेतकरी हे फारच अल्प आहेत. यावरून असे दिसते की वाशिम जिल्हयातील अल्पभुधारक शेतकऱ्यांचे प्रमाण फारच जास्त आहे.

वाशिम जिल्हयातील सिंचन प्रकल्प :-

तालुका	मोठे प्रकल्प	मध्यम प्रकल्प	लघु प्रकल्प	पाझर तलाव	कोल्हापूरी बंधारे	भुयारी साठवण	उपसा जलसिंचन
मालेगांव	०	१	२५	३७	३९	२	०
मंगरूळपीर	०	०	२३	२६	५१	४	०
कारंजा	०	१	१६	१२	१८	०	०
मानोरा	०	०	३७	२०	१७	००	०
वाशिम	०	१	२९	३५	१०	०	०
रिसोड	०	०	२०	१५	२६	१	१
एकूण	०	३	१५०	१४५	१६१	७	१

वाशिम जिल्हयातील सिंचनाच्या संदर्भात वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, जिल्हयात एकही सिंचनाचा मोठा प्रकल्प नसला तरी तीन मध्यम प्रकल्प मात्र असल्याचे दिसून येतात एकूण लघु प्रकल्प १५० असून , पाझर तलाव १४५ व कोल्हापूरी बंधारे १६१ आहेत. भुयारी साठवण प्रकल्प ०७ असून उपसा जलसिंचन प्रकल्प केवठ एक आहे. त्यावरून असे म्हणता येईल की, सिंचनाच्या प्रकल्पांच्या बाबतीत वाशिम जिल्हा अतिशय मागसलेला आहे. जादातर सिंचनासाठी शेतकरी व बोअरवेल वरच अवलंबून आहेत.

जिल्हयातील ओलीतखालील क्षेत्र :-

तालुका	ओलीताखालील स्थूल क्षेत्र	एकुण लागवडी खालील स्थूल क्षेत्र	ओलीताखालील लागवडील खालील स्थूल क्षेत्राशी प्रमाण
मालेगाव	३२११	६९७०३	५.३१ टक्के
मंगरूळपीर	७९७०	६३२५३	१२.६० टक्के
कारंजा	२८७०	७२९७३	३.९३ टक्के
मानोरा	३८१३	५७३९०	६.६४ टक्के
वाशिम	७९४२	८२२०६	९.६६ टक्के
रिसोड	५६०३	७७९०५	७.१९ टक्के
एकुण	३१४१७	४२३४३०	७.४२ टक्के

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते की जिल्हयात एकुण केवळ ७.४२ टक्के क्षेत्र ओलीताखालील आहे.सर्वाधिक ओलीताखालील क्षेत्र मंगरूळपीर तालुक्यात असून सर्वात कमी ओलीताखालील क्षेत्र कारंजा तालुक्यात असल्याचे लक्षात येते.एकूण लागवड खालील स्थूल क्षेत्राच्या बाबतीत सर्वाधिक क्षेत्र वाशिम तालुक्यात असून त्याठिकाणी ९.६६ टक्के क्षेत्र ओलीताखालील आहे महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत हे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

जिल्हयातील पिकपध्दती खरीप पिक-२०१४-२०१५

पिक प्रकार	सरासरी क्षेत्र	प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र	टक्केवारी
एकुण तृनधान्य	३५८३०	१११७३	२.७१ टक्के
एकुण कडधान्य	११९१७०	६८७०१	१६.६७ टक्के
एकुण गळीतधान्य	२१५०००	२९६९७८	७२.०८ टक्के
कपाशी	५६३७०	३४९६०	८.४८ टक्के
ऊस	२२०	१८२	०.०४ टक्के
एकुण खरीप	४२६५९०	४१११९४	१०० टक्के

वाशिम जिल्हयातील कृषीचे अध्ययन करतांना असे दिसुन येते की,जिल्हयामध्ये कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र सर्वाधिक असून अल्पभूधारक शेतकऱ्याचे प्रमाण ८९.७७ टक्के असुन त्यांच्याकडे जवळपास ६७ टक्के जमीन आहे.त्याचप्रमाणे जिल्हयात एकही मोठा सिंचनाचा प्रकल्प नसून केवळ ३ मध्यम प्रकल्प आहे.त्यामुळेच जिल्हयात एकुण केवळ ७.४२ टक्के जमीन सिंचनाखाली आहे.पिकाच्या बाबतीत विचार जिल्हयामध्ये७२ टक्के पिक सोयाबीनचेच घेतली जाते.सदर पिक हे कोरडवाहू आहे तर रब्बी पिकाचे हरब-याशिवाय दुसरे कोणतेही पिक फारसे घेतल्या जाऊ शकत नाही.असे असले तरी सोयाबीनची उत्पादकता अत्यंत कमी असुन त्यामध्ये सुध्दा चढउतार होत असल्याचे दिसुन येते.त्याचे मुख्य कारण म्हणजे जिल्हयातील शेती ही मुख्यंत:निसर्गावरच अवलंबून असुन निसर्गाने साथ दिली तरच शेती फायदेशीर ठरते अन्यता नुकसानीत जाते इतर कोणतेही शेतीवर अधारीत उद्योग जिल्हयात नसल्यामुळे व रोजगाराची साधने उपलब्ध नसल्यामुळे जिल्हयातील शेतकरी हा आर्थिक दृष्टया फारच मागासलेला असल्यामुळे जिल्हयात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे.

समारोप:-

वाशिम जिल्हयातील कृषि व्यवसायाचा विकास करावयाचा अहवाल प्रथम सिंचन वाढविणे अंत्यत आवश्यक आहे.ज्या ठिकाणी शक्य असेल तेथे पाणी आडवा पाणी जिरवा हे तत्व अंवलबणे गरजेचे आहे.शेततळी पासुन तर मोठे धरणे बांधणे आवश्यक आहे.

पाण्याची व्याख्या केल्यानंतर शेतकऱ्यासाठी २४ तास विज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे शेतकऱ्याशी संवाद साधला असता पाणी असुन सुध्दा विजे अभावी शेतीला पाणी देता येत नाही.

डॉ.पजाबराव कृषि विद्यापीठ अकोला यांनी पुढाकार घेऊन मातीचे परिक्षण करणे व त्याबाबत शेतकऱ्यांना कोणते घटक शेतीला आवश्यक आहेत.त्याबाबत सपूर्ण शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.आपल्या स्पर्धेच्या युगात पारपंरीक पिक न घेता मागणी नुसार पिक घेण्यासंबधी त्यांना पूर्ण माहीती देणे.तसेच फळबाग घेण्यासाठी जास्तीत जास्त अनुदान देऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त अनुदान कसे घेता येईल त्याबाबत मार्गदर्शन करणे चांगल्या दर्जाची व भरपूर उत्पादन देणारी बियाणे विकसित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे.

तसेच उत्पादन खर्चावर आधारीत शेतमालाला योग्य किंमत दिल्यास वाशिम जिल्हयातील शेतकरी हा समाधीणी व समृध्द होईल.

संदर्भ:

१) वाशिम जिल्हा समालोचन.
२) जिल्हा परिषद कृषि विभाग अहवाल.
३) जिल्हा कृषि अधिक्षक कार्यालय अहवाल.
४) जिल्हा परिषद जलसिंचन विभाग अहवाल.
५) जिल्हा भुमी अधिक्षक कार्यालय अहवाल.